# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
# मुंबई विभागीय मंडळ, वाशी, नवी मुंबई - ४०० ७०३

परिपत्रक क्र:मुंविमं/उ.मा.प. (इ.१२वी )/ प्रवेशपत्र (Hall-Ticket) / फेब्रु/मार्च -२०२५/००८८ दि.१०/०१/२०२५

<u>विषय</u>:- फेब्रुवारी / मार्च -२०२५ उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेच्या प्रवेशपत्र (Hall-Ticket) संदर्भातील सूचना.

मुंबई विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, या मंडळामार्फत घेण्यात येणा-या इ. १२वी च्या फेब्रु/ मार्च-२०२५ परीक्षेचे प्रवेशपत्र मंडळाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने शुक्रवार दिनांक १०/०१/२०२५ रोजी College login मध्ये download करण्याकरिता उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

## <u>प्रवेशपत्राबाबत महत्वाच्या सूचना</u>

१. फेब्रुवारी / मार्च -२०२५ च्या परीक्षेस आपल्या कनिष्ठ महाविद्यालयामार्फत प्रविष्ठ होणा-या सर्व विद्यार्थ्यांची प्रवेशपत्र **online** प्राप्त झालेली आहेत का याबाबत खात्री करावी. प्रवेशपत्र कमी प्राप्त झाल्यास त्वरीत पुराव्यानिशी वाशी येथील विभागीय मंडळात समक्ष कळवावे. विद्यार्थ्यांना / पालकांना परस्पर मंडळ कार्यालयात पाठवू नये.

२. ज्या आवेदनपत्रांना " Paid " असे Status प्राप्त झालेले आहे त्यांचीच प्रवेशपत्रे "Paid Status Admit Card" या पर्यायाद्वारे उपलब्ध होतील.

३. अतिविलंबाने आवेदनपत्रे भरलेल्या व Extra Seat No विभागीय मंडळामार्फत दिलेल्या विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे "Extra Seat No Admit Card" या पर्यायाद्वारे उपलब्ध होतील.

४. ज्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशपत्रामध्ये नाव/आईचे नाव/जन्मतारीख अशा दुरूस्त्या असल्यास सदर दुरूस्त्या Online पध्दतीने करावयाच्या असून त्याकरीता Application Correction ही Link उपलब्ध करून देण्यात आलेली असून विहित दुरूस्ती शुल्क भरून दुरूस्त्या विभागीय मंडळाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात याव्यात व विभागीय मंडळाच्या मान्यतेनंतर " Correction Admit Card " या Link द्वारे सुधारीत Admit Card उपलब्ध होतील.

**५. ज्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशपत्रावर विषय बदल व माध्यम बदल आहे, अशा प्रवेशपत्रावर योग्य ती लाल शाईने दूरूस्ती करून दोन प्रतीत मंडळात घेवून यावे व मंडळाकडून प्रमाणित करून घ्यावे. आणि तीच प्रत संबंधित विद्यार्थ्यास व केंद्रास देण्यात यावी. त्याशिवाय केंद्र संचालक विद्यार्थ्यास त्या विषयास प्रविष्ठ करणार नाहीत, याची नोंद घ्यावी. विषय / माध्यम बदल असल्यास प्रचलित पध्दतीनुसार विभागीय मंडळात प्रत्यक्ष संपर्क साधून योग्य त्या दुरूस्त्या करण्यात याव्यात.**

६. ज्या आवेदनपत्रांना "Paid" असे Status प्राप्त झालेले नाही अशा आवेदनपत्रांचे शुल्क प्राप्त झाल्यानंतर त्यांचे Status Update होवून " Late Paid Status Admit Card " या Option द्वारे त्यांची प्रवेशपत्रे उपलब्ध होतील.

७. ज्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशपत्रावर विषय बदल, माध्यम बदल असेल अशा विद्यार्थ्यांबाबत परीक्षेपूर्वी मंडळास कळविण्यात यावे, जेणेकरून विद्यार्थ्यास संबंधित विषयाची प्रश्नपत्रिका केंद्रावर उपलब्ध करणे शक्य होईल.

<u>तसेच विद्यार्थ्यांच्या प्रवेशपत्रातील विषय / माध्यम बदलाच्या दुरुस्त्या सोबतचे प्रपत्र "अ" मध्ये अचूक नोंद करुन दुरूस्तीच्या प्रवेशपत्रासह दिनांक २३/०१/२०२५ पर्यंत मंडळ कार्यालय, वाशी येथे समक्ष जमा कराव्यात.</u>

८. ज्या प्रवेशपत्रावर विद्यार्थ्यांचा फोटो / स्वाक्षरी नसेल अथवा चुकीच्या विद्यार्थ्यांचा फोटो / स्वाक्षरी असेल किंवा फोटो / स्वाक्षरी अस्पष्ट असेल अशा प्रवेशपत्रावर योग्य विद्यार्थ्याचा / विद्यार्थीनीचा फोटो लावून व स्वाक्षरीच्या ठिकाणी स्वाक्षरी घेऊन प्राचार्यांनी प्रवेशपत्र प्रमाणित करुन विद्यार्थ्यास देण्यात यावे. त्याची छायांकित प्रत प्रमाणित करुन पत्रासह विद्यार्थी प्रविष्ट होणा-या परीक्षा केंद्रास देऊन त्याची एक प्रत मंडळ कार्यालयास पाठविण्यात यावी.

९. प्रवेशपत्र विद्यार्थ्यांकडून गहाळ झाल्यास संबंधित उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांनी पुन:श्च प्रिंट काढून त्यावर लाल शाईने द्वितीय प्रत (Duplicate) असा शेरा देवून विद्यार्थ्यांस प्रवेशपत्र द्यावयाचे आहे.



Scanned with OKEN Scanner

१०. विद्यार्थ्यांनी प्रवेशपत्रातील **दुरूस्तीची मागणी केल्यास नियमानुसार राज्यमंडळाचे पत्र क्र.रा.मं./परीक्षा-३/२४३६, दिनांक ०९/०६/२०२३ मध्ये नमुद केल्यानुसार दंड आकारण्यात येईल.** तसेच ज्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशपत्रावर माहिती तंत्रज्ञान (I.T.) विषयास प्रविष्ठ होण्याबाबतची दुरुस्ती असेल अशा विद्यार्थ्यांयसाठी फी **रु.२००/-** तसेच प्रात्यक्षिक विषयास प्रविष्ठ होण्याबाबतची दुरुस्ती असल्यास प्रति विषय रु.**१५/-** फी मंडळाकडे जमा करणे आवश्यक आहे.

**टिप :- वरील प्रमाणे दुरूस्त्या असल्यास त्वरित मंडळास लेखी कळवावे अन्यथा** निकालानंतर विद्यार्थ्यांच्या नावांत, विषय व माध्यम इत्यादी बदल बाबत मंडळाकडे प्रकरण आल्यास सर्वस्वी जबाबदारी आपली राहील याची नोंद घ्यावी.

११. No Candidate केलेल्या परीक्षार्थ्यांची प्रवेशपत्रे संबधित विद्यार्थ्यांना वितरीत करण्यात येवू नये व अशी प्रवेशपत्रे मंडळ कार्यालयात जमा करावेत.

१२. कनिष्ठ महाविद्यालयामार्फत विद्यार्थ्यांना देण्यात येणारी प्रवेशपत्राबाबत कोणतेही शुल्क आकारणी न करता विद्यार्थ्यांना देण्यात यावीत. तसेच याबाबत विद्यार्थी /पालकांची तक्रार येणार नाही, याची नोंद घ्यावी.

१३. श्रेणीसुधार योजनेअंतर्गत प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांना **पर्यावरण विषय (EVS/31) व आरोग्य व शारिरीक शिक्षण (PT/30) या विषयांमध्ये आधीच्या परीक्षेतील श्रेणी या योजनेखाली होणाऱ्या परीक्षेसाठी ग्राहय (Carry Forward) धरल्या जातील.**

*** सदर परिपत्रक आपल्या दप्तरी जतन करुन ठेवण्यात यावे. मंडळाची सर्व परिपत्रके व इतर राज्यमंडळाच्या www.mahahsscboard.in या संकेतस्थळावरील Home Page वरुन मुंबई विभागीय मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असून माहिती व कार्यवाहीसाठी संकेतस्थळाचा नियमित वापर करण्यात यावा, तसेच शासन व मंडळ संकेतस्थळ (Website) दररोज पहावे.**

(ज्योत्स्ना शिंदे-पवार)
प्र.विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ,
वाशी नवी मुंबई- ४०० ७०३.

प्रति,

प्राचार्य,
मुंबई विभागीय मंडळ कक्षेतील सर्व मान्यता प्राप्त कनिष्ठ महाविद्यालये.



Scanned with OKEN Scanner

## HSC EXAMINATION (12th) JULY-AUGUST 202

**Proforma indicating errors which is not shown in the Pre-list and candidates directly appeared for the Examination without information to the college for change in subject medium to be submitted on or before --------------- without fail.**

**COLLEGE INDEX NO – J --------------------**

## Proforma – A (ONLY Subject/ Medium Correction)

| SR. NO. | SEAT NO. | ORIGINAL POSITION IN THE COLLEGE LIST | | | CORRECT POSITION AS PER COLLEGE RECORD | | | REMARKS |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | SUB. NAME | SUB CODE | MEDIUM | SUB. NAME | SUB CODE | MEDIUM | |
| 1 | | | | | | | | |
| 2 | | | | | | | | |
| 3 | | | | | | | | |
| 4 | | | | | | | | |
| 5 | | | | | | | | |
| 6 | | | | | | | | |
| 7 | | | | | | | | |
| 8 | | | | | | | | |
| 9 | | | | | | | | |
| 10 | | | | | | | | |

**DATE :-**

**Signature of Principal with Stamp**

Scanned with OKEN Scanner